Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक
सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २२२ • Title - Code :- MAHMAR49513 • गुरुवार दि.२३ मे २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

पुण्यातील पोर्शे अपघात प्रकरण
अल्पवयीन आरोपीचा जामीन रद्द

५ जूनपर्यंत बालसुधारगृहात रवानगी; वडीलही २४ मेपर्यंत पोलिस कोठडीत

पुणे (वृत्तसंस्था)–पुणे पोर्शे अपघात आणि खून प्रकरणात बाल न्याय मंडळाने बुधवारी अल्पवयीन आरोपीचा जामीन रद्द करून त्याला ५ जूनपर्यंत बालसुधारगृहात पाठवले. आरोपी हा एका प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिकाचा मुलगा असून त्याने १८ मे रोजी रात्री दारूच्या नशेत दुचाकीला त्याच्या पोर्श कारने धडक दिली. या अपघातात एक आयटी इंजिनियर मुलगा आणि बाईक चालवणाऱ्या मुलीचा मृत्यू झाला होता. आरोपीला बाल न्याय मंडळाने काही अटींसह १५ तासांच्या आत सोडले, मात्र बुधवारी त्याला पुन्हा एकदा बोलावण्यात आले.वास्तविक, हे प्रकरण गंभीर असल्याचे सांगत जुवेनाईल बोर्डाच्या निर्णयाविरोधात पुणे पोलिसांनी सत्र न्यायालयात अपील केले होते. या आदेशाचा आढावा घेण्यासाठी न्यायालयाने पोलिसांना जुवेनाईल बोर्डाकडे जाण्याचे निर्देश दिले होते. यानंतर बुधवारी पोलिसांच्या अर्जावरून मंडळाने आरोपींना पुन्हा बोलावले. पोलिसांनी त्यालाही चौकशीसाठी बोलावले आहे.

पोलिसांनी आरोपी तरुणाचे वडील बिल्डर विशाल अग्रवाल यांना बुधवारी न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्याला २४ मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. न्यायालयातून नेत असताना काही लोकांनी पोलिस व्हॅनवर शाई फेकली आणि घोषणाबाजी केली.मिळालेल्या माहितीनुसार, पुणे पोलिसांनी बुधवारी सकाळी अल्पवयीन आरोपीला कोर्टात हजर केलं. त्यावेळी युक्तीवाद करत असताना पोलिसांनी मुलगा दारु प्यायला होता हे न्यायालयाला पटवून देण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी अल्पवयीन मुलाने कोझी किचन हॉटेलमध्ये भरलेलं ४८ हजार रुपयांचे बीलही कोर्टासमोर सादर केलं. तसेच आरोपीने केलेलं कृत्य हे अत्यंत भीषणावह आहे, त्यामुळे त्यांच्यावर खटला चालवण्यासाठी परवानगी देण्यात यावी, अशी मागणी पोलिसांनी केली.तर दुसरीकडे बचावपक्षाच्या वकिलांनी मुलगा अल्पवयीन असल्याचा युक्तीवाद केला. दोन्ही बाजूचे युक्तीवाद झाल्यानंतर न्यायालयाने अखेर हा आदेश दिला.पुण्यातील कल्याणीनगरमधील अपघाताला कारणीभूत ठरलेल्या अल्पवयीन मुलावर दाखल गुन्ह्यात पोलिसांनी नव्या कलमाची वाढ केली आहे. त्यानंतर अल्पवयीन आरोपी मुलाने कोर्टात हजेरी लावली आहे. मद्यधुंद अवस्थेत कार चालवल्याप्रकरणी अल्पवयीन मुलावर १८५ कलमाच्या अंतर्गत नव्याने गुन्हा दाखल करण्यात आला. याआधी त्याच्यावर कलम ३०४ अंतर्गत सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र अल्पवयीन असल्याच्या कारणावरुन न्यायालयाने त्याला जामीन मंजूर केला होता. या मुलाला दुपारी १२ वाजता बाल हक्क कोर्टासमोर हजर करण्यात आले. तर आरोपी मुलाचे वडील विशाल अगरवाल यांना अटक करण्यात आली असून त्यांना तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

दारू सोडण्याची औषध खाल्ल्याने दोन तरुणांचा मृत्यू

चंद्रपूर । प्रतिनिधी

जिल्ह्यातील भद्रावती तालुक्यातील गुडगाव येथील दोन युवकांची दारू सोडण्याची औषध खाल्ल्याने मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. तर दोघांची प्रकृती चिंताजनक असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहे.सहयोग सदाशिव जीवतोडे (वय१९), प्रतीक घनश्याम दडमल (२६, रा. गुडगाव) अशी या मृतांची नावे आहे.

भद्रावती तालुक्यातील गुडगाव येथील चार जण जाम जवळील शेडगाव जिल्हा वर्धा येथे शेळके महाराजांकडे दारू सोडवण्यासाठी २१ मे रोजी गेले होते. महाराजांनी त्यांना औषध दिली. सायंकाळी गावी परतल्यानंतर या चारही तरूणांनी ही औषध घेतली. यानंतर चौघांचीही प्रकृती बिघडली. त्यांना लगेच भद्रावती येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. यावेळी सहयोग सदाशिव जीवतोडे (१९), प्रतीक घनश्याम दडमल (२६, रा. गुळगाव) या दोघांचा मृत्यू झाला. तर सदाशिव पुंजाराम जीवतोडे (४५) आणि सोमेश्वर उद्धव वाकडे (३५) यांची प्रकृती चिंताजनक आहे.या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला आणि घटनेचे गांभीर्य पाहून पोलिसांनी तपास सुरू केला आहे. मृतांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहेत, रुग्णालयात दाखल झालेल्यांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचे सांगण्यात येत आहे .पुढील तपास भद्रावती पोलीस करीत आहे .

वेकोलीत स्थानिक ट्रक चालक मालकांना
रोजगार द्या अन्यथा रस्त्यावर उतरू–राजू झोडे यांचा इशारा

चंद्रपूर । प्रतिनिधी

चंद्रपुरातील वेकोलीच्या बल्लारपूर ,राजुरा ,धोपटाळा कोळसा खाणीत मागील अनेक वर्षांपासून स्थानिक ट्रक चालक मालक कोळसा वाहतुकीचे काम करत आहेत.मात्र आता त्यांच्या हाताला काम मिळत नसून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. स्थानिक ट्रक चालक मालकांना रोजगार द्या अन्यथा स्थानिकांना सोबत घेऊन रस्त्यावर उतरू असा गर्भित इशारा उलगुलान संघटनेचे अध्यक्ष राजू झोडे यांनी दिला आहे.तसे निवेदन तहसीलदार यांना देण्यात आले.

तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, राजुरा
महाराष्ट्र शासन
महसूल

बल्लारपूर–राजुरा तालुक्यातील धोपटाळा कोळसा खाणीत मागील अनेक वर्षांपासून जवळपास २५० च्या वर ट्रक चालक मालक काम करत आहेत. मात्र यात कोळसा वाहतुकीचे काम अनेक ट्रान्सपोर्टस ला देण्यात आले असून स्थानिकांना डावलले जात आहे. त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. त्यामुळे उलगुलान संघटनेचे अध्यक्ष राजू झोडे यांना काही कामगारांनी आपबीती सांगितली असता झोडे यांनी तात्काळ दखल घेत तहसीलदार यांची भेट घेतली व लवकरात लवकर स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून द्यावा अन्यथा रस्त्यावर उतरू असा इशारा राजू झोडे ,रसिया निषाद, मंसूर चच्चा, राजनारायन यादव, नंदन शर्मा, संतोष वर्मा, शम्मी सिद्दीक़ी, नरेश गुंड्डापल्ली, शमशुल ,राजा निषाद यांनी दिला आहे.

मौजा पिरली येथील पांदण रस्त्याचे खडीकरण करा
पिरली येथील शेतकऱ्यांचे तहसीलदारांना साकडे

भद्रावती । प्रतिनिधी

मौजा पिरली येथील गुलाब मुळे यांच्या शेतापासून ते कृष्णा विठोबा टोंगे यांच्या शेतापर्यंता पांदण रस्ता आहे. या पांदण रस्त्याने पावसाळ्यात साधे पायदळ जावू शकत नाही. या शिवारातील सर्व शेतकऱ्यांना या रस्त्याने वारंवार शेतीच्या कामासाठी ये–जा करावे लागते. या पांदन रस्त्याचे खडीकरण करण्याची मागणी निवेदनाद्वारे शेतकऱ्यांनी भद्रावती तहसील चे तहसीलदार यांचे कडे केली आहे .

पावसाळ्यात शेतामध्ये शेतकरी बैलगाडी सुध्दा नेवू शकत नाही या चार महिन्यामध्ये रस्त्याने जातांना कसरत करावी लागते. गुडघाभर चिखलातून बैल सुध्दा जायची हिंमत करत नाही. या पांदण रस्त्याने जणाऱ्या सर्व शेतकऱ्यांना शेतामध्ये खत शेतीची अवजारे घेवून जावी लागतात. आतापर्यंत अनेक जनावरे दगावली आहेत.शेतकऱ्यांना सुध्दा खूप हाल सहन करावे लागतात. त्याच रस्त्याने मधुमक्षिका पालन केंद्रात जावू शकत नाही. या पांदण रस्त्याचे खडीकरण करून देण्यात यावे. अशी मागणी निवेदनातून शेतकऱ्यांनी केली आहे .

पाचशे रुपयांची लाच घेताना
पुरवठा निरीक्षक एसीबीच्या जाळ्यात

मुलचेरा । प्रतिनिधी

रेशन दुकानातील साहित्य मिळण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने कार्डवर नाव चढविण्यासाठी लागणारी कागदपत्रे अपलोड करण्यासाठी पाचशे रुपयांची लाच घेणाऱ्या मुलचेरा तहसील कार्यालयाच्या पुरवठा निरीक्षकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले. राहुल भाऊजी डोंगरे (४० वर्ष) असे त्या पुरवठा निरीक्षकाचे नाव आहे.

प्राप्त माहितीनुसार, मुलचेरा तालुक्यातील मुखडी टोला येथील तक्रारदाराच्या वहिनीच्या कुटुंबियाचे नाव ऑनलाईन पद्धतीने चढवलेले नसल्यामुळे रेशन कार्डवर त्यांना साहित्य मिळत नव्हते. ही प्रक्रिया करण्यासाठी तक्रारदार हे तहसील कार्यालय मुलचेरा येथे पुरवठा निरीक्षक राहुल डोंगरे यांना भेटले असता त्यांनी महाफुड या ऑनलाईन साईटवर कागदपत्रे अपलोड करावे लागतील असे सांगितले. त्यासाठी पाचशे रुपये लाचेची मागणी केली. दरम्यान तक्रारदाराने एसीबीकडे संपर्क केला. त्यानुसार सापळा रचून दि. २१ मे ला मुलचेरा तहसील कार्यालयात ही कारवाई करण्यात आली.

महाराष्ट्र शासन
तहसिल कार्यालय, मुलचेरा
स्थापना १५ ऑगस्ट १९९२

मोटारसायकल व दागिने चोरणाऱ्या चोरट्यांना अटक

चंद्रपूर । प्रतिनिधी

रामनगर पोलिसांनी एका अल्पवयीन मुलासह दोन चोरट्यांना अटक केली असून त्यांच्याकडून ८ मोटारसायकली व दागिने जप्त करण्यात आले आहे . तक्रारदार, खुर्शीदा बानू रहीम शेख (४५, रा. पागलबाबा नगर मेडिकल कॉलेज रोड, आहुजा गॅरेजजवळ) यांनी ८ मे २०२४ रोजी रामनगर पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवली की, ४ मे रोजी ती तिच्या एका नातेवाईकाच्या लग्न समारंभाला गेली होती. ७ मे रोजी दुपारी १ वाजता घरी परतताना अंगणात ठेवलेला जुनी मोटारसायकल क्र. एम एच ३४ बी ई ९३६५ बेपत्ता आहे. तसेच घराच्या मागील बाजूच्या दरवाजाचे कुलूपही तुटले आहे. चोरीचा संशय आल्याने त्यांनी घरात जाऊन पाहिले असता बेडरूममधील तीन लोखंडी कपाटांमधून १५ हजार रुपये किमतीचा ५ ग्रॅम वजनाचा सोन्याचा हार, १८ हजार रुपये किमतीचे ६ ग्रॅमचे सोन्याचे तीन जोडे, ३० हजार रुपये किमतीचे १० वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र आढळून आले. ग्रॅम, ९ हजार रुपयांचे सोन्याचे मंगळसूत्र मणी, दारले ३ ग्रॅम, ६ हजार रुपयांची सोन्याची अंगठी २ ग्रॅम, १२ रुपयांची चांदीची चाळ २ जोड्या, १ हजार रुपयांची चांदीची अंगठी, ६ जोड्या, २० हजार रुपयांची जुनी पॅशन प्रो मोटरसायकल क्र. एम एच ३४ बी ई ९३६५ असा एकूण १ लाख २०० रुपयांचा माल चोरीला निदर्शनास आल्यानंतर पोलिसांनी तक्रार नोंदवून चोरट्यांचा शोध सुरू केला.

जुनोना चौक बाबूपेठ आवारात एक जुनी पेन्शन प्रो मोटरसायकल असल्याची माहिती पोलिसांना खबऱ्याकडून मिळाली. एम एच ३४ बी ई ९३६५ कोणीतरी विक्रीच्या उद्देशाने फिरत आहे. पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी पोहोचून मोटारसायकल ताब्यात घेऊन युवकाला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने तो निखिल अनिल मकलवार (२४, रा. जुनोना चौक, बल्लारशा) असल्याचे सांगितले. आधी खोटी उत्तरे देऊन पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करण्यात आला. नंतर त्याने अल्पवयीन मुलासह चोरीच्या गुन्ह्याची कबुली दिली. या दोघांनी आतापर्यंत रामनगर, बल्लारशाह, चंद्रपूर शहर, नागपूर शहरात वेगवेगळ्या ठिकाणाहून मोटारसायकल चोरल्याचे सांगितले. वर नमूद केलेल्या मोटारसायकल व्यतिरिक्त ढतड ज्युपिटर मोपेड एम एच ३४ बी डबलू १३०१, सोन्याचे टॉप्स, सिल्व्हर व्हील्स, होंडा एक्टिव्हा मोपेड क्र. एम एच ३४ ए एन. १२०९, होंडा क्टिवा मोपेड क्र. एम एच ३४ बी के ६४२७, हिरो स्प्लेंडर प्लस क्र. एम एच ३४ बी सी . ०७४८, टी व्ही एस ज्युपिटर क्र. एम एच ३४ सी ए ८१२०, क्टीवा क्र. एम एच ३४ ए डबलु ८०२५, टी वी एस ज्युपिटर मोपेड क्र. एमएच ४० सीई ६७९१ असा एकूण २ लाख ९६ हजार ६०० रुपयांचा माल जप्त करण्यात आला. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक रिना जनबंधू यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी सुधाकर यादव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील गाडे, पो.नि. यशवंत कदम, सहायक पोलिस निरीक्षक देवाजी नरोटे, पोलीस उपनिक्षक मधुकर सामलवार, दीपेश ठाकरे, पोलीस हवालदार पेत्रस सिडाम, शरद कुडे, सचिन गुरनुल, प्रशांत शेंद्रे, आनंद खरात, लालू यादव, हिरालाल गुप्ता, रविकुमार ढेंगळे, . संदीप कामडी, विकास जुमनाके, विकास जाधव, पंकज ठोंबरे, मनीषा मोरे आदींनी केले.

बौद्ध बांधवांचा सर्वात महत्त्वाचा सण व उत्सव!

बुद्ध पौर्णिमा तीन कारणांसाठी विशेष आहे. हा विशेष योगायोग म्हणजे वैशाख पौर्णिमेच्या दिवशी गौतम बुद्धांचा जन्म झाला होता. याच दिवशी बुद्धांना ज्ञानप्राप्ती झाली होती आणि याच दिवशी बुद्धांचे महानिर्वाण झाले होते, असे सांगितले जाते. बुद्ध पौर्णिमा केवळ भारतातच नव्हे तर जगातील अनेक देशांत साजरी केली जाते. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर माहितीपूर्ण संकलित लेख आपल्या सेवेत... संपादक.



संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष- ७१३२७९६६८३.

बुद्ध जयंती किंवा बुद्ध पौर्णिमा हा बौद्ध धर्मीयांचा सर्वात महत्त्वाचा सण व उत्सव आहे. हा सण जगभरात विशेषतः भारतात वैशाख पोर्णिमेच्या दिवशी साजरा केला जातो. या दिवशी तथागत गौतम बुद्धांचा जन्म, ज्ञानप्राप्ती व महापरिनिर्वाण या तीनही घटना झाल्या आहेत. आपल्या मानवतावादी आणि विज्ञानवादी धम्म सिद्धांतामुळे तथागत बुद्धांना जगातील महापुरुष व गुरू मानले जाते. बौद्ध धर्मीयांची मोठ्या प्रमाणावर संख्या असणाऱ्या चीन, जपान, व्हियेतनाम, थायलंड, भारत, म्यानमार, श्रीलंका, सिंगापूर, अमेरिका, कंबोडिया, मलेशिया, नेपाळ, इंडोनेशिया या देशांसह सुमारे १८० देशांतील बौद्ध लोक हा सण उत्साहात साजरा करतात. यातील अनेक देशात बुद्ध जयंतीची सार्वजनिक सुट्टी असते. भारतात देखील बुद्ध पौर्णिमेनिमित्त सार्वजनिक सुट्टी असते. बुद्ध पौर्णिमेनिमित्त विविध उपक्रम असे असतात- या दिवशी बौद्ध घरांमध्ये दिवे प्रज्वलित केले जातात आणि फुलांनी घर सजवले जाते. बौद्ध धर्माच्या धर्मग्रंथांचे अखंड वाचन, पठण केले जाते. बुद्ध विहारांमध्ये आणि घरांमध्ये अगरबत्त्या लावल्या जातात. बुद्ध मूर्तीवर फळ-फूल चढवले जाते आणि दिवा लावून पूजा केली जाते. बोधिवृक्षाची पूजा केली जाते. त्याच्या फांद्यांवर हार व रंगीत पताका सजवल्या जातात. मुळांना दूध व सुगंधित पाणी दिले जाते. वृक्षाच्या भोवती दिवे लावतात. या दिवशी मांसाहार वर्ज्य असतो. पक्ष्यांना पिंजऱ्यातून मुक्त करून खुल्या आकाशात सोडले जाते. गरिबांना भोजन व वस्त्र दिले जाते. बौद्ध अनुयायींना तेथे जाऊन प्रार्थना करता यावी यासाठी दिल्ली येथील बौद्ध संग्रहालयातील बुद्धांच्या अस्थी बाहेर काढून ठेवतात.

विश्ववंद्य विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली दि.२ मे १९५० रोजी भारतात पहिली सार्वजनिक बुद्ध जयंती दिल्ली येथे साजरी झाली. याप्रसंगी आंबेडकरांनी बुद्धांच्या जीवनकार्यावर विचार मांडले. या जयंती समारोहास अनेक देशांचे वकील, प्रतिनिधी, भिक्खू समुदाय व सुमारे वीस हजार लोकांचा समुदायही उपस्थित होता. अशाप्रकारे भारतात बुद्ध जयंतीची सुरुवात झाली. सन १९५१मध्ये आंबेडकरांच्याच अध्यक्षतेखाली तीन दिवसीय बुद्ध जयंती महोत्सव साजरा झाला. सन १९५६ला बाबासाहेबांनी आपल्या आयुष्यातील शेवटची बुद्ध जयंती दिल्लीतच साजरी केली. दिल्लीनंतर बाबासाहेब आंबेडकरांनी महाराष्ट्रातही बुद्ध जयंतीस सन १९५३पासून सुरुवात केली. सन १९५६पर्यंत त्यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख उपस्थितीत बुद्ध जयंतीचे महाराष्ट्रात भव्य कार्यक्रम झाले. महाराष्ट्रातले बुद्ध जयंतीचे कार्यक्रम प्रामुख्याने मुंबईत झाले. भारतात व महाराष्ट्रात बुद्ध जयंती महोत्सवाच्या परंपरेची सुरुवात बाबासाहेब आंबेडकर केली, म्हणून ते भारतातील सार्वजनिक बुद्ध जयंती महोत्सवाचे प्रणेते ठरतात. इतर सर्व धर्म संस्थापकांच्या जन्मदिनी देशात सुट्टी मिळते. मग मानवतेचा महान संदेश देण्याऱ्या तथागत बुद्धांच्या जयंतीस सुट्टी का नाही? एक तर नियोजित सुट्ट्यातील एक सुट्टी कमी करा अथवा एक सुट्टी वाढवून आम्हाला द्या. अशी आग्रही मागणी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तत्कालीन केंद्र सरकारकडे केली होती. बुद्ध जयंतीदिनी सार्वजनिक सुट्टी असावी, ही सन १९४२पासूनच मागणी होती. आंबेडकरांच्या प्रयत्नांमुळे व दबावामुळे २७ मे १९५३ रोजी केंद्र सरकारने बुद्ध जयंती निमित्त सार्वजनिक सुट्टी जाहीर केली. महाराष्ट्र सरकारने मात्र त्या वर्षी



सार्वजनिक सुट्टी जाहीर केली नाही. या सर्व बाबींचा उल्लेख बाबासाहेबांनी सन १९५३च्या आपल्या मुंबईतील बुद्ध जयंती कार्यक्रमाच्या भाषणात स्वतः केला आहे.

जगातील दुःख नाहीसे करण्यासाठी भगवान गौतम बुद्धांनी निरनिराळे मार्ग अनुसरले. यासाठी स्वतःचे घरदार सोडून ध्यान मार्ग आणि तपश्चर्येचा मार्गही अनुभवला. मात्र, वैशाख शुद्ध पौर्णिमेला त्यांना ज्ञान प्राप्त झाले आणि दुःखाचे मूळ व ते नाहीसे करण्याचा मार्ग सापडला. म्हणून ही पौर्णिमा बुद्ध पौर्णिमा म्हणून साजरी केली जाते. आरंभीच्या प्रथमावस्थेतील बौद्ध धम्म हा अगदी साधा, समजण्यास सोपा, नैतिक तत्त्वांवर भिस्त ठेवणारा व मानवता, करुणा व समानता यांचा पुरस्कार करणारा असा होता. या काळात बुद्ध हा असामान्य गुणवत्ता असलेला, पण मानवदेह धारण करणाराच मानला जात होता. त्यांना बोधिवृक्षाखाली संबोधी- ज्ञान प्राप्त झाले म्हणजे त्यांना या जगात कोणती अबाधित सत्ये आहेत व जगाचे रहाटगाडगे कसे चालते, या सबंधीचे ज्ञान प्राप्त झाले. त्यांना प्रथम चार आर्य सत्यांचा साक्षात्कार झाला. जगात खोल दृष्टीने विचार करता व सर्वत्र चालू असलेले भांडण-तंटे, झगडे, हाणामारी हे दृश्य पाहून सर्वत्र दुःख पसरलेले आहे. या पहिल्या आर्य सत्याची जाणीव झाली. दुःख कशामुळे उत्पन्न होते, यासबंधी विचार करता त्यांना आढळून आले की, हे सर्व लोभामुळे, तृष्णेमुळे उत्पन्न होते. एकाच वस्तूबद्दल दोन व्यक्तींच्या मनात तृष्णा उत्पन्न झाली म्हणजे ती वस्तू स्वतःला मिळविण्याकरिता भांडण-तंटे, झगडा, हाणामारी आलीच. तेव्हा तृष्णा हे दुःखाचे मूळ आहे, असे दुसरे आर्य सत्य त्यांना उमजले. ज्या ज्या गोष्टीला एखादे कारण आहे ती ती गोष्ट, कारण नाहीसे केले म्हणजे, नष्ट होते. हे अबाधित तत्त्व आहे. म्हणून त्या दुःखाचा निरोधही होऊ शकतो, हे तिसरे आर्य सत्य त्यांना समजले. निरोध होऊ शकतो तर तो प्राप्त करून घेण्याचा मार्ग असलाच पाहिजे, हे चौथे आर्य सत्यही त्यांना कळून आले.

बुद्ध पौर्णिमेला बोधगया येथे जगभरातून बौद्ध अनुयायी येतात आणि प्रार्थना करतात. बिहारमधील बोधगया हे बौद्ध धम्मानुयायांचे पवित्र तीर्थक्षेत्र आहे. गृहत्यागानंतर सिद्धार्थांनी सत्याच्या शोधासाठी सात वर्ष कठोर तपश्चर्या व साधना केली आणि त्यानंतर त्यांना बोधगया येथील एका बोधिवृक्षाखाली बुद्धत्व किंवा ज्ञानप्राप्ती झाली. ही घटना वैशाख पौर्णिमेला झाली. तेव्हापासून हा दिवस बुद्ध पौर्णिमा म्हणून ओळखला जातो. बुद्ध पौर्णिमेच्या वेळी कुशीनगर येथे महापरिनिर्वाण विहार या ठिकाणी एक महिना तथागत गौतम बुद्धांचे स्मरण केले जाते. हे ठिकाण गौतम बुद्ध यांच्याशी संबधित असले तरी बौद्धांसह आजूबाजूच्या परिसरातील अन्य लोक देखील या ठिकाणाला मोठ्या संख्येने भेट देतात व येथील बुद्ध विहारात आस्थापूर्वक पूजा करतात. या विहाराचे महत्त्व गौतम बुद्धांच्या महापरिनिर्वाणाशी जोडले गेले आहे. या विहाराचे स्थापत्य अजिंठा लेण्यांच्या विहारासारखे आहे. या विहारात गौतम बुद्धांची अंतिम क्षणाच्या मृत्युशय्येवर पडलेल्या अवस्थेतील- भू-स्पर्श मुद्रा ६.१ मीटर लांबीची मूर्ती आहे. ही मूर्ती लाल मातीपासून बनवलेली आहे. जेथून मूर्तीसाठी माती काढली आहे तेथेच हा विहार तयार केला आहे. विहाराच्या पूर्व भागात एक स्तूप आहे. तेथे गौतम बुद्धांवर अंतिम संस्कार झाले.

बुद्ध जयंतीच्या दिवशी बौद्ध अनुयायी घरांमध्ये दिवे लावतात. घरे फुलांनी सजवतात. बौद्ध परंपरेतील धम्मग्रंथांचे वाचन, पठण केले जाते. विहारातील तसेच घरातील बुद्धांच्या मूर्तीची फुले वाहून, दिवे ओवाळून पूजा केली जाते. बोधिवृक्षाचीही पूजा केली जाते आणि त्याच्या फांद्यांना पताकांनी सुशोभित केले जाते. वृक्षाच्या आसपास दिवे लावले जातात. झाडाच्या मुळाशी दूध आणि सुगंधी पाणी घातले जाते. या दिवशी केलेल्या चांगल्या कामांमुळे पुण्य मिळते अशी समजूत आहे. बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी दिल्ली येथील संग्रहालयातील बुद्धाच्या अस्थी सर्वांच्या दर्शनासाठी बाहेर ठेवल्या जातात, तिथेही येऊन लोक प्रार्थना करतात. या दिवशी बौद्ध धर्माचे अनुयायी बौद्ध परंपरेतील लुंबिनी, सारनाथ, गया, कुशीनगर, दीक्षाभूमी अशा पवित्र धम्मस्थळांना जाऊन प्रार्थना व पूजा करतात. बौद्ध धम्माशी संबंधित सूत्रे, त्रिपिटके यातील भागांचे वाचन व पठण केले जाते. व्रताचा भाग म्हणून या दिवशी उपवास केला जातो. दानधर्म केला जातो. या दिवशी अनेक प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले जातात. वेगवेगळ्या देशात तेथील रीति-रिवाज आणि संस्कृतिनुसार कार्यक्रम आयोजित केले जातात. श्रीलंका तसेच अन्य आग्नेय आशियायी देशात हा दिवस वेसक उत्सव म्हणून साजरा केला जातो. हा वैशाख शब्दाचा अपभ्रंश आहे.

!! बुद्ध पौर्णिमेनिमित्त भगवान तथागतांच्या मंगल चरणी कोटी कोटी दंडवत प्रणाम !!

अष्टांगिक मार्गाने निब्बाण प्राप्त होते !

प्रविण बागडे
नागपूर
९९२३६२०९१९

आज समाजाचे एकंदर चित्र पाहिल्यावर असे दिसते की, समाज हा गरीबी, अज्ञान, अंधश्रध्दा, भ्रष्टाचार, पिळवणूक, लोभ, अनैतिकता यांनी ग्रासित झाला आहे. अशा अशुध्द मानव निर्मित वातावरणात व्यक्तीचा विकास साधणे अशक्यप्राय गोष्ट आहे. मग अशा समाजाचा विकास कितीही साधण्याचा प्रयत्न केला तरी विकास साधता येत नाही. कारण त्या ठिकाणी व्यक्तीच्या विकासाची काहीही तरतूद नाही, म्हणून असा समाज अविकसित असतो. व्यक्ती विकासाला पूर्णपणे स्वातंत्र्य देवून समाज हा विकसित व सुसंस्कृत बनविण्याचा मार्ग म्हणजे भगवान बुध्दांनी सांगितलेला आर्य अष्टांगिक मार्ग आहे. सम्यकदृष्टि, सम्यक संकल्प, सम्यक वाणी, सम्यक कर्मान्त, सम्यक आजिविका, सम्यक व्यायत, सम्यक स्मृति व सम्यक समाधी या अंगानी परिपूर्ण असलेल्या मार्गाला भगवान बुध्द आर्य मार्ग संबोधतात. अष्टांगिक मार्गाला संपूर्ण तत्वज्ञानाचा गाभा मानल्या जातो. त्यामुळेच व्यक्तीचा सर्वांगिण विकास उपरोक्त मार्गानुसार आचरण केल्यास निब्बाण प्राप्त करता येते.

भोग आणि क्लेश ही जीवनाची आत्यंतिक दोन टोके टाळून यामधला सुलभ, सरळ ज्ञानाचा सन्मार्ग म्हणजे तथागतांचा मध्यममार्ग होय. या मध्यममार्गाचा तथागतांनी केलेल्या शिकवणीचा उपदेश म्हणजे धम्म. सर्वप्रथम वैशाख पौर्णिमेचे महत्व समजावून घेणे आवश्यक आहे, कारण या दिवशी सिध्दार्थ गौतमाचा जन्म, ज्ञानप्राप्ती व महापरिनिर्वाण या तीनही घटना वैशाख पौर्णिमेच्याच दिवशी घडतात ही काही साधारण बाब नाही, हा चमत्कार ही नाही. याला एक आगळं-वेगळं महत्व आहे, ही वस्तुस्थिती आहे, हे सत्य कोणीही नाकारु शकत नाही. ज्यांचा आज आपण जन्मोत्सव साजरा करीत आहोत, अशा स्थितप्रज्ञ महामानवास त्रिवार वंदन.

विश्वबंधुत्व, समानता व मानवी स्वातंत्र्य, एकमेकांविषयी प्रेम भावना, करुणेची भावना इत्यादि मानवाच्या कल्याणासाठी हितकारक गुणतत्वे जोपासणाऱ्या विज्ञाननिष्ठ, तर्कशुध्द, निर्भेड व विशुध्द जीवन मार्गावर आधारित अलौकिक अशा पवित्र धम्माची स्थापना करणारे जगातील पहिले क्रांतिकारी महामानव म्हणजेच तथागत भगवान गौतम बुध्द होत. सिध्दार्थ गौतमाने रोहिणी नदीच्या वादातून गृहत्याग केला व परिव्रजा घेतली. कपिलवस्तुहून राजगृहास आले असता मगधधिपती राजा बिंबीसार यांनी त्याची भेट घेतली. राजा बिंबीसार यांनी सिध्दार्थ गौतमास ऐहीक सुखोपभोगाबाबत उपदेश केला आपण पुन्हा कपिलवस्तुत परतुन राज्योपभोग घ्यावा, तेथे जाणे उचित वाटत नसल्यास मी माझे अर्धे राज्य आपणांस देतो तेथे आपण राज्य करावे अशी विनंती केली, परंतू संन्यासाचा जीवन मार्ग अवलंबू नये.

तद्प्रसंगी सिध्दार्थाने राजा बिंबीसारला विचारपुर्वक गांभीर्याने खणखणीत उत्तर दिले सुख म्हणजे उपभोग, असे सर्वसाधारण मानले जाते. कसोटीला लागल्यास त्यापैकी एकही उपभोगण्याच्या योग्यतेचे आहे असे आढळत नाही. तहान भागविण्यासाठी पाण्याची आवश्यकता असते, तसेच भुक शमविण्यासाठी अन्न हवे असते आपली नग्नता झाकण्यासाठी व थंडी वाऱ्यापासून संरक्षण करण्यासाठी कपडयांची आवश्यकता असते, झोपेची गुंगी घालविण्यासाठी बिछाना असतो, प्रवासाचा शीण होवू

नये म्हणून वाहन असते उभे राहण्याचा त्रास कमी करण्यासाठी आसन असते. तसेच शरीराची शुध्दी, आरोग्य यासाठी स्नान एक साधन असते. फक्त बाहय वस्तु म्हणजेच मानवाच्या दुःख निवारण्याची साधने नव्हती. म्हणून अन्न-वस्त्र-निवारा इत्यादी मुलभुत गरजांना प्राधान्य न देता मानवी कल्याणाचा सुखाचा शोध घेण्यासाठी ज्ञान अर्थात शिक्षण महत्वाचे असते. मिळविलेल्या ज्ञान चिंतनातून मानवाच्या कल्याणासाठी खास जीवनमार्ग शोधला ज्ञानाने व्यक्तीचा सर्वांगीण विकास घडविण्यास मदत होते, हा संदेश संपुर्ण विश्वाला तथागताने दिला. व्यक्ति विकासासाठी मानवास शिक्षणाचे-ज्ञानाचे महत्व किती आहे, हे आपल्या देशातील अनेक महामानवाने जाणले. मानवाचे कल्याण त्याचे सुख कशात आहे. याचा शोध घेता महामानवांना आढळले की, प्रथम प्रत्येक व्यक्ति ही शिक्षित-ज्ञानी झाली पाहिजेत. शिक्षणज्ञान मानवाच्या कल्याणाचे, सुखाचे प्रमुख अंग आहे. त्याचा विकासत राजमार्ग आहे, हा राजमार्ग सर्वप्रथम जगाला दाखविला महाकारुणिक गौतम बुध्दाने. भगवान बुध्दांच्या व्यक्तीमत्वाचे विविध पैलू आहेत. त्यांच्या विविध पैलूंचा अभ्यास विविध अंगानी व विविध दृष्टीकोणातून होणे आज आवश्यक आहे. तथागत बुध्दाच्या व्यक्तीमत्वामध्ये ज्याप्रमाणे चुंबकीय तत्व होते, त्याचप्रमाणे त्यांचे तत्वज्ञानामध्ये असे चुंबकीय तत्व होते की, ज्यामुळे असंख्य लोक त्यांच्या व्यक्तीमत्वाने प्रभावित झालेले होतेच. परंतू त्याही पेक्षा कितीतरी पटीने त्यांच्या तत्वज्ञानाने, त्यांच्या तत्वज्ञानातील सभ्यतेने प्रभावित होऊन त्यांनी त्याचे अनुयायीत्व स्विकारलेले होते. बुध्दाच्या व्यक्तिमत्वाची छाप व त्यांच्या तत्वज्ञानाची पकड इतकी मजबुत आहे की, भारत भुमीच्या या महापुत्राने केवळ भारताचाच नव्हे तर संपुर्ण विश्वालाच प्रभावित केलेले आहे. भारताच्या इतिहासामध्ये एवढा प्रतिभा संपन्न, प्रखर बुध्दिवादी, ध्येयवादी व मानवतावादी अजून कधी झालेला नाही. यापुढे देखील होणे नाही ज्याला संपुर्ण जग सन्मानपुर्वक विनम्र होत असते. बुध्द हा अशा स्वयं प्रज्ञेचा माणुस होता की, ज्याने जगाला पहिल्यांदा प्रखर बुध्दिवादाची व ध्येयवादाची शिकवण दिली. भगवान बुध्द म्हणतात, अत्त-दिपो-भव, अत्त-विरहत, अत्त-सरणी अर्थात हे मानव प्राण्यांनो स्वत:चे दिप व्हा, स्वयं प्रकाशित व्हा आणि स्वत:ला शरण जावून स्वत:चच विचरण करा, दुसऱ्या कुणालाही शरण जावू नका, दुसरा कुणीही तुम्हाला शरण जाण्या योग्य नाही तुम्ही स्वत:च स्वत:चे शरणस्थान आहात, यामध्ये जगाच्या सभ्यतेचा व संस्कृतीच्या इतिहासामध्ये भगवान बुध्दाने पहिल्यांदा मनुष्याला परा प्रवृत्ती, दैव, ईश्वर, आत्मा परमात्मा संकल्पना पासून मुक्त होण्याचा महामंत्र दिला व तो जोपासून ठेवणे ही आजच्या काळाची गरज आहे.

धम्म हा जीवनाच्या विविधांगी पैलूंना स्पर्श करणारा असतो. केवळ वैयक्तिक मोक्षप्राप्ती नसुन इतर सर्व मानवाला मोक्षदाता म्हणुन हितकारक व लाभदायी ठरणारा असतो. म्हणूनच सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, नौतिकमूल्ये अशा सर्वच बाबींना स्पर्श करणारा तो मोठा वर्तुळ परिघ ठरतो. ''बुध्द आणि कार्ल मार्क्स'' या विषयी काठमांडू येथील विवेचनपूर्ण भाषणात त्यांनी समाजाला पर्यायाने प्रत्येक व्यक्तिला धम्माची नितांत गरज असल्याचे सांगीतले. धर्म ही अफुची गोळी आहे, ही कम्युनिस्टांची धारणा फोल ठरविली. जगातील सर्वधर्म सारखेच आहेत ही धारणाही त्यांनी उखडून फेकली. बुध्दाचा धम्म हा आकाशातील अनेक ताऱ्यां पैकी कसा वेगळा आहे, त्याचे तेज कसे वेगळे आणि दैदिप्यमान आहे, हे सत्य जाणून घेण्यासाठी त्यांनी सर्वांना आवाहन केले होते हे विसरता येत नाही.

बुध्दाचे चरित्र आणि चारित्र्य निर्मळ पाण्याच्या प्रवाहासारखे होते. तो करुणेचा महासागर होता, रंजल्या गांजल्यांचा तो कैवारी, सखा, मित्र आणि मार्गदर्शक होता. जगाच्या इतिहासात अशी माणसे अपवादात्मक असतात अशा सम्यक सम्बुध्दाला अनुसरुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आमच्या पुढे सर्जनशील आदर्श निर्माण केला. बुध्द-बाबासाहेब हे आमच्या सर्वकष मुक्तीचे मार्गदर्शक आहेत. त्यांनी आम्हाला सन्मार्ग उपलब्ध करुन दिला आहे, मार्गक्रमण आम्हाला करावयाचे आहे. त्यासाठी स्वयं प्रकाशित होवून आम्ही बुध्द-धम्म व संघ यांच्या प्रती एकनिष्ठ राहून धम्मचक्र प्रवर्तनाची सम्यक क्रांती गतीमान ठेवली पाहीजे. अशा महान तत्ववेत्यास त्यांच्या २५६८ व्या जयंती निमित्त नमन

पर्बतोंसे आज मै टकरा गया

उझ्बेक प्रवासाच्या दुसर्या दिवसाचे स्थान होते चिमगम माऊंटेन आणि चार्वाक लेक. ताश्कंद पासून १०० किमी अंतरावरील ग्रेटर चिमगम माऊंटेन हे चटकाल पर्वत श्रृंखलेतील सर्वात उंच शिखर असून याची उंची जवळपास ३३०९ मिटर इतकी आहे. तर छोटे शिखर २१०० मिटर उंचीचे आहे. ताश्कंद पासून इथे यायला अंदाजे दिडदोन तास लागतात परंतु मार्गातील निसर्गरम्य द्रुष्ये, उंच पहाड, घनदाट हिरवीगार व्रुक्षराजी प्रवास सुकर करते. त्यातही हळूहळू तापमान कमी होत गेल्याने प्रवासाचा आनंद द्विगुणीत होतो. चिमगम माऊंटेनला उझ्बेकचे स्वित्झरलँड म्हणतात. कारण ही पर्वत श्रृंखला कुठे शुभ्र बर्फाने, कुठे हिरव्याकंच फर व्रुक्षांनी तर कुठे पांढर्याशुभ्र खळखळत्या जलधारांनी अलंक्रुत असते. चिमगम चा अर्थ ग्रीन ग्रास अथवा ग्रीन व्हॅली असा होतो.

इथे खरी मजा येते चेअर लिफ्ट ने शिखरावर जाण्यात! एकतर इथे कडाक्याची थंडी, जवळपास सहा डिग्री सेल्सिअस, त्यातही ओपन चेअर, सुरक्षेच्या नावाखाली चेअरला आडवी एक छोटी लोखंडी सळी! खरोखरच ही राईड म्हणजे डर के आगे, बहोत जादा डर है या प्रकारातली. मुख्य म्हणजे बेस कॅम्प ला ट्रिन चेअर येताच तुम्हाला खो दिल्यासारखे अक्षरशः चेअरमध्ये ढकलून दिले जाते. अब तुम्हारे हवाले वतन साथियों म्हणत आणि देवाचा धावा करण्यावाचून तुमच्याकडे दुसरा पर्याय नसतो. जसजसे आपण वर ओढल्या जातो तसतसे पोटातले गोळे वाढत जातात. चुकूनही खाली लक्ष गेले तर पोटात फुलपाखरू उडायला लागते. प्रारंभी हवीहवीशी आणि गुलाबी वाटणारी थंडी हळूहळू शरीराची कुल्फी करू लागते.भिती, रोमांच, धाकधूक या संमिश्र भावनेतून दहा मिनिटात शिखरावर आपण पोहोचतो परंतु तोपर्यंत आपली अवस्था दहा गेले आणि पाचच राहिले अशी होते. त्यातही खाली उतरायला पुन्हा एकदा त्याच अग्निदिव्यातून जावे लागेल या नुसत्या कल्पनेने अंगावर काटा उभा राहतो. पण आपला नाईलाज असतो. यावेळी एक शेर नक्की आठवतो, तो म्हणजे, ‘खुद ही को कर बुलंद इतना के आसमां पर पहुंचे और खुदा तुझसे पुछे, ऐ बंदे तू अब निचे उतरेगा कैसे!’ चेअर लिफ्ट मधून उतरतांना सुद्धा पुन्हा एकदा उडी मारतच उतरावे लागते कारण चेअर लिफ्ट सतत फिरत असते. मात्र एकदाचे खाली उतरले की ह्रदयाची धडधड कमी होते आणि सभोवतालचा नयनरम्य परिसर मन मोहून घेतो. आभाळाला हात टेकवणारी पर्वतशिखरे, भुरभूर वाहणारा गार वारा, काळजाचा थरकाप उडवणार्या खोल दर्याखोर्या मस्त मौसम तयार करतात.पंधरा विस मिनिटे इथे रमल्यावर खाली उतरतांना पुन्हा तोच अनुभव, मनावर तेच दडपण, तिच भिती. मात्र यातून बाहेर पडण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे दुसर्या बाजुने वर येणार्या पर्यटकांशी संवाद साधणे. हाय, हॅलो, गुड मॉर्निंग



करत आपली भिती दाबून इतरांच्या भितीची मजा घेणे. परदुःख शितलः असे म्हणतात ते याचसाठी. खाली उतरल्यावर सर्वात पहिले कोणते काम केले असेल तर ते कॉफी पिणे. यानंतरचा पाडाव होता चार्वाक लेक. चार्वाक चा अर्थ चार बाग, चार गार्डन. हे जलाशय चिर्चीक, स्केम, कोसू आणि चटकाल या चार नद्यांद्वारे निर्मित केले गेले आहे. चिर्चिक या मुख्य नदीवर १६८ मिटर उंचीचे दगडी धरण बांधून हा प्रकल्प १९६४ ते १९७० दरम्यान पूर्णत्वास आला. मात्र हे धरण बांधतांना जवळपास १५० पुरातत्व वास्तु, स्थळे पाण्याखाली गेली.१९६६ ला ताश्कंदला विनाशकारी भुकंपाने ग्रासले होते. त्यावेळी शहराच्या पुनर्निर्मितीसाठी वीजचे उत्पादन करण्याकरिता चार्वाक हायड्रो पॉवर स्टेशन उपयोगी पडले. या जलाशयाची नैसर्गिक रचना इतकी सुंदर आहे की जणुकाही निष्णात कलाकाराने एखादे रेखाचित्र रेखाटले असावे. खरेतर हे जलाशय मुख्य मार्गापासून आंत आणि बरेच खाली आहे. जलाशयाजवळ जाण्यासाठी स्पोर्ट्स मोटरबाईक (फोर व्हिल ड्राइव्ह) उपलब्ध असतात. हा एक वेगळाच थ्रिल आहे. कच्च्या रस्त्यावरून नागमोडी वळणांसह खाली उतरणे, वर चढणे जीवाचा थरकाप उडवून जातो. टू सिटर या बाईकवर प्रोफेशनल ड्रायव्हर बाजूला लटकून स्टिअरिंग सांभाळत असतो. अगदी आपल्याकडे ऑटोरिक्षा चालवतात तसे.ही राईड आटोपताच आम्ही दुपारच्या जेवनासाठी फैज उझ्बेक रेस्टॉरंटला गेलो. खरेतर उझ्बेक आहार हा मुख्यतः मांसाहारी असतो. अंडी, चिकन, लॅम्ब (मेंढी), मासे आणि काही ठिकाणी चक्क घोड्याचे मांससुद्धा त्यांच्या नियमीत आहाराचा भाग असतो. खाण्यात मोठ्या प्लेट एवढा गोलाकार अंतर्वक्र पाव, ज्याला ते नान म्हणतात असतो, सोबत योगर्ट (दही) आणि दोन प्लेट तुडुंब भरलेला सलाद. भाजी हा प्रकार उझ्बेक आहारात जवळपास नसतोच. तर्री, रस्सा कशाला म्हणतात हे त्यांच्या गावीही नसते. बरं नॉनव्हेज तरी कसं देतात तर कबाब करून. लोखंडी सळीत पिसेस लटकवून तर व्हेज सेक कबाब म्हणजे वांगे, आलू, टोमॅटो, सिमला मिरची भाजून परतवून. भात खरेतर अगदी प्रसादा सारखा दिला जातो. पेय पदार्थात पाण्याचा वापर फारच कमी, त्याऐवजी आंब्याच्या पन्ह्याच्या चवीचा आंबटगोड हम्बोट चेरी ज्युस देतात.

डॉ.अनिल पावशेकर

महाविद्यालयांनी शिक्षण सर्वेक्षणाची माहिती अचूक भरावी-प्र-कुलगुरु डॉ.श्रीराम कावळे

अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रमातंर्गत एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन

गडचिरोली । प्रतिनिधी

विद्यापीठ व संलग्नीत असलेली महाविद्यालये, शैक्षणिक संस्थानात असणाऱ्या सोयी-सुविधा, विद्यार्थी संख्या, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची प्रवर्गनिहाय संख्या, उत्तीर्ण-अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांची संख्या, महाविद्यालयाची आर्थिक स्थिती, स्कॉलरशिप, नॅक तसेच ईतर सांख्यिकी माहिती या सर्वेक्षणामार्फत शैक्षणिक संस्थाकडून दरवर्षी ऑनलाईन मागविल्या जाते. हि माहिती शैक्षणिक, एनईपी, नॅक तसेच दर्जेदार शिक्षणाच्या दृष्टीने महत्वाची असल्याने महाविद्यालयांनी शिक्षण सर्वेक्षणाची माहिती अचुक भरावी, असे आवाहन विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. श्रीराम कावळे यांनी केले.

अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रमातंर्गत एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते.कार्यशाळेला परीक्षा व मुल्यमापन विभागाचे संचालक दिनेश नरोटे, असिस्टंट प्रोग्रामर तथा अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रमाचे नोडल अधिकारी प्रमोद बोरकर तसेच विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयातील नोडल अधिकारी उपस्थित होते.

मार्गदर्शन करतांना प्र-कुलगुरु डॉ. कावळे म्हणाले, विद्यापीठ स्थापनेपासूनच विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयांची शैक्षणिक माहिती संकलित करुन केंद्र व राज्य शासनाला पाठविली जाते. हि माहिती विहीत वेळेत व अचुक जावी, त्याबाबतचे ज्ञान मिळावे यासाठी शासनाने वर्षातून दोनदा कार्यशाळेचे आयोजन करण्याचे सुचविले आहे. अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षणाबाबत विशेष म्हणजे, विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातून प्राप्त झालेली माहिती राज्य शासनास सर्वात प्रथम सादर करणारे विद्यापीठ म्हणून गोंडवाना विद्यापीठास उच्च शिक्षण विभागाच्या संचालकाने प्रशस्तीपत्र देवून गौरविण्यात आले, हि विद्यापीठासाठी अभिमानाची बाब असल्याचे ते म्हणाले. त्यासोबतच, महाविद्यालयाची इत्यंभुत माहिती कशाप्रकारे भरुन पाठवावी हे सर्वांनी या कार्यशाळेच्या माध्यमातून समजून घ्यावी असेही डॉ. कावळे म्हणाले. अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रमाचे नोडल अधिकारी प्रमोद बोरीकर म्हणाले, अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण (-ISHE) हा उपक्रम भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने सन २०११-१२ पासून सुरु केला आहे. या उपक्रमात देशभरातील संपुर्ण विद्यापीठे, विद्यापीठाशी संलग्नीत असलेली महाविद्यालयाची माहीती सर्वेक्षणामार्फत ऑनलाईन मागविल्या जाते. सदर माहीती https://aishe.gov.in/aishe/home या लिंकद्वारे संकलीत करुन देशातील उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारणे, शिक्षणासाठी पायाभुत सुविधा तयार करणे आदी कामांसाठी केला जातो. केंद्रशासन आपले शैक्षणिक धोरण आखतांना सदर माहिती उपयोगात आणत असल्याने सर्व महाविद्यालयांना माहिती देणे बंधनकारक करण्यात आले आहे. - ISHE ची माहिती भरताना येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी विद्यापीठात कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असल्याचे श्री. बोरकर म्हणाले.

बल्लारपूर तालुक्यातील अनेकांचा आम आदमी पार्टीत पक्षप्रवेश

बल्लारपूर । प्रतिनिधी

येथील शासकीय विश्रामगृहात आम आदमी पार्टीच्या मोठ्या पक्षप्रवेश कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हाध्यक्ष मयूर राईकवार यांच्या मार्गदर्शनात तर जिल्हा समिती सदस्य परमजीत सिंग झगडे, विधी सल्लागार ऍड. किशोर पुसलवार, बलराम केसकर आणि विशाल माने यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम पार पडला.

यावेळी जिल्हा सचिव राज नगराळे, जिल्हा संघटन मंत्री शंकर अरोरा, जिल्हाध्यक्ष शेतकरी संघटना दीपक बेरशेट्टीवार यांची प्रमुख उपस्थिती लाभली. बल्लारपूरमध्ये आम आदमी पार्टीचा मजबूत पक्षप्रवेश झाल्याचे जिल्हाध्यक्ष मयूर राईकवार यांनी सांगितले.चंद्रपूर जिल्ह्यात आम आदमी पार्टीची मजबूत संघटना उभी राहिली असून, लोकहिताच्या विविध मुद्यांवर ही संघटना कार्यरत आहे. दिल्ली येथील आम आदमी पार्टी सरकारच्या धर्तीवरच लोकशाही मूल्यांचे संवर्धन करणाऱ्या धोरणांना प्राधान्य देण्यात येत आहे. जिल्ह्यातील जनतेच्या विकासासाठी आम आदमी पार्टी सातत्याने प्रयत्नशील राहणार आहे.या कार्यक्रमाला जिल्हा समितीचे निलेश जाधव, शमशेर सिंग चव्हाण, विशाल माने यांच्या सह दीपक वाडके, नागेंद्र शर्मा, दिनेश जयस्वाल, आशिष गेडाम, सुमित ताकसांडे, शंकर अडवाणी, नवी पठाण, इरशाद शेख, अंकुश सुरतीकर, लव सुरवतीकर, देवा फुलकर, सोनू सय्यद, कालिदास जुनगरे, फिरोज शेख, अहमद शेख, आतिश वैरागडे, इमरान खान, संजय वर्मा, हेमंत ठाकरे, नाना माडमवार, अजय शिवाचे, बंडू मेश्राम, संजय ठाकरे, अर्जुन झांजोटे, सुमित झांजवटे, दत्ता घोणे, दिनेश आसटकर, सुरेश नाडमवार तसेच ईतर पदाधिकारी व पक्ष कार्यकर्ते उपस्थित होते.

गिमाटेक्स वणी युनिट च्या कामगारांकडून मृत कामगाराच्या परीवाराला मदतीचा हात

आ.कुणावार यांचे शुभहस्ते सोपविला धनादेश

हिंगणघाट । प्रतिनिधी

गिमाटेक्स वणी युनिट येथिल पंकज सैनी हा रिंगफेम विभागात कामगार म्हणून कार्यरत होता, मागील दोन महिन्यापुर्वी काही कारणास्तव गळफास लावून आत्महत्या केली, त्या अनुषंगाने वर्धा जिल्हा सुती मिल मजदूर संघटनेचे अध्यक्ष तथा विधानसभा क्षेत्राचे आमदार समिर कुणावार यांच्या निर्देशानुसार कामगार संघटनेने गिमाटेक्सचे फॅक्टरी मॅनेजर पठाण यांचेमार्फत पाठपुरावा करून सर्व कामगारांच्या पगारातुन प्रती १०० रू कपात करून एकुण १ लाख ४३ हजार २०० रूपयांचा धनादेश मृत कामगाराच्या परीवाराला देण्यात आला.

यावेळी आ. कुणावार यांचेसह उपस्थित संघटनेचे जनरल सेक्रेटरी पांडुरंग बालपांडे, दिवाकर बरबटकर,राकेश तराळे, प्रशांत शेळके, विजय थुल, विनोद कोल्हे, लक्षण जयपुरकर, राहुल देशमुख, हेमंत भगत, दामोदर देशमुख,जिवन भानसे, मनोज जुमडे, विनोद कावळे, श्रावण थुटे, जयंत बावणे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

घोडाझरी तलावातील कृत्रिम गाळ न काढल्यास पाणीपुरवठा बंद करणार?

तळोधी (बा.) । प्रतिनिधी

शेती सिंचनासाठी इंग्रज काळात निर्मानधिन चंद्रपूर जिल्ह्यातील नागभिड तालुक्यातील घोडाझरी तलावामध्ये नागभिड, नेरी, तळोधी या गावांना पाणीपुरवठा करणाऱ्यां मोठमोठ्या विहिरिचे बांधकाम करण्यांत आले. त्यासाठी तलावामध्ये मोठ्या प्रमाणात बाहेरून मुरुम व माती तलावामध्ये टाकण्यात आली. तसेच विहिरींचा निघालेला गाळ सुध्दा तलावातच ठेवण्यात आला. त्यामुळें तलावाचा काही भाग सपाट झाला परिणामी पाण्याचे साठवण क्षमतेवर परिणाम झाल्याने या तलावातील गाळ

त्वरीत उपसा करावा अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

इ.स.१९२३ ला इंग्रज काळात निर्माण केलेल्या घोडाझरी तलावातील पाणी नागभिड, सिंदेवाही या तालुक्यातील जवळपास सात हजार हेक्टर शेतीला सिंचनासाठी वापरण्यात येतो. सदर तलावाला शभंर वर्ष पुर्ण झाले असुन या तलावातील नैसर्गिक तयार झालेला गाळ सुध्दा आजपर्यंत एकदाही काढण्यात आला नाही. उलट या तलाव शेकडो ब्रास मुरूम,माती टाकून विहिरींचे बांधकाम करण्यासाठीं व विहिर खोदकामातील माती संपुर्ण तलावातच पसरविण्यात आली. त्यामुळे तलावाचे काही भागांत सपाटिकरण झाले. त्यामुळे पाणीसाठवनुकीवर मोठा परिणाम झाल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. पाणीपुरवठ्याचे नावाखाली विहिर खोदकामातील माती, व नैसर्गिक जमा झालेला गाळाचा उपसा करावा या मागणीसाठी नागभिड तहसिलदार यांना नुकतेच निवेदनाद्वारे मागणी केली आहे. असुन घोडाझरी तलावातील गाळ उपसा न केल्यास नागभिड, नेरी, तळोधी या तिन्ही पाणीपुरवठा विहिरी बंद करण्याचा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. निवेदन देताना बि.आर.एस.पी.चे विधानसभा अध्यक्ष निकेश रामटेके, नरेंद्र मेश्राम, पंचम खोब्रागडे, केशव मेश्राम, प्रशांत भाकरे, रुपेश भाकरे, तथा शेतकरी उपस्थित होते.

तथा
...कारी दंडाधिकारी, नागभी

घोडाझरी तलावातील पाणीपुरवठा विहिरी खोदकामातील माती, व बांधकामासाठी बाहेरून वापरण्यात आलेला शेकडो ब्रास मुरूम व मातीचा त्वरीत उपसा करण्यात यावा अन्यथा पाणीपुरवठ्याच्या विहिरी बंद पाडण्यासाठी जनआंदोलन करण्यांत येईल.

-निकेश रामटेके, बिआरएसपी विधानसभा प्रमुख, नागभिड

पुणे हिट अँड रन प्रकरण; पोलिसांच्या तपासावर प्रश्नचिन्ह-विजय वडेट्टीवार

मुंबई (वृत्तसंस्था)-दोन निष्पाप लोकांचा जीव घेणाऱ्या पुणे अपघाताची न्यायिक चौकशी व्हावी. पोलिसांच्या तपासावर प्रश्नचिन्ह आहे अशी मागणी पुण्यातील हिट अँड रनप्रकरणी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. त्यांनी यासंदर्भात ट्विट करत संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. पुण्यात झालेल्या भीषण अपघातात पुणे पोलिसांच्या तपासावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. त्यामुळे या प्रकरणी न्यायिक चौकशी व्हावी असे वडेट्टीवार यांनी आपल्या ट्विटमध्ये म्हंटले आहे.वडेट्टीवार आपल्या ट्विटमध्ये पुण्यातील या अपघाताबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. ''पुणे अपघातातील आरोपीची अल्कोहोल चाचणी निगेटिव्ह असल्याचा अहवाल पोलिसांनी दिला आहे. अल्पवयीन असलेला आरोपी दारू पित असल्याचे सीसीटीव्ही फुटेज असूनही हा अहवाल आल्याने पोलिसांच्या तपासावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत'', असे वडेट्टीवार म्हणाले.

पुढे वडेट्टीवार म्हणाले, ''अल्पवयीन आरोपीला दारू कशी उपलब्ध झाली? रजिस्ट्रेशन नसलेली गाडी पुण्यातील रस्त्यावर कशी आली? नियम डावलून बार आणि पब सुरू होते का? असतील तर त्यांच्यावर कारवाई का नाही? या प्रश्नांचा तपास न करता आरोपीला निर्दोष सिद्ध करण्यासाठी जणू पुणे पोलिसांचा तपास असल्याचे चित्र आहे''.वडेट्टीवार यांनी आरोपी अल्पवयीन आहे हे माहीत असताना त्याच्या वडिलांना अटक करण्यात इतका वेळ का लागला? असा प्रश्न उपस्थित करत या घटनेची न्यायिक चौकशी व्हावी आणि या प्रकरणात पुणे पोलिसांची सुद्धा चौकशी व्हावी अशी मागणी केली आहे. दरम्यान, मंगळवारी सकाळीच छत्रपती संभाजीनगमधून अल्पवयीन आरोपीच्या वडिलांना अटक करण्यात आली आहे. आता याप्रकरणी पुढील कारवाई सुरू आहे. मात्र पुण्यात या अपघाताच्या घटनेमुळे मोठी खळबळ उडाली आहे.

आर.के.च्या गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा पालकांसह अभिनंदन सोहळा

पुलगाव । प्रतिनिधी

नुकताच उच्च माध्यमिक शालान्त परीक्षेचा निकाल जाहीर झाला आणि आर. के. कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक कामगिरी करीत संस्थेचा नावलौकिक कायम ठेवला.या औचित्याने महाविद्यालयात सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकांसह अभिनंदन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

विज्ञान विभागातील निकाल१०० टक्के लागला. कु हिमानी कमलकिशोर आहुजा ९५.३३ टक्के गुण प्राप्त करून महाविद्यालयात तसेच वर्धा जिल्ह्यातही विज्ञान विभागात गुणानुक्रमे प्रथम आली. तीचे पुष्पगुच्छ ,मिठाई व आर के हायस्कूल ट्रस्टच्या वतीने चांदीचे नाणे देवून शाळा समिती अध्यक्ष रंजन बाबू केजडीवाल यांच्या हस्ते अभिनंदन करण्यात आले. या प्रसंगी प्राचार्य संजय सहारे, मुख्य समन्वयक नूरसिंग जाधव, उपमुख्याध्यापक माया वंडलकर,उपप्राचार्य सुनील भोयर, पर्यवेक्षक गणेश इंगळे, लालबहादूर यादव व अंशतः अनुदानित विभागाचे प्रमुख जितेंद्र वर्मा उपस्थित होते. विज्ञान विभागात निदा रशीद कामील ९०.६७ टक्के प्रणिता संतोष फरसोले ९०.१७ टक्के गुणांसह यांना अनुक्रमे द्वितीय व तृतीय स्थान प्राप्त झाले. अंशतः अनुदानित विज्ञान विभागातील निकाल १०० टक्के लागला आहे व त्यात प्रथम सुनील गवई ८३.८३ टक्के पार्थ देवेंद्र राऊत ७६.५० टक्के व आयुष शेखर पतालिया ७५ टक्के गुण प्राप्त करून यांनी अनुक्रमे प्रथम,द्वितीय व तृतीय स्थान प्राप्त केले. कला विभागातील निकाल समाधानकारक लागला आहे. त्यात षष्ठतिला विलास ढोणे ७५.५० टक्के , स्वाती दिलीप कुडमते ७४.६७ टक्के व कोमल गणेश डगवार ७३ टक्के गुण प्राप्त करून यांनी अनुक्रमे प्रथम,द्वितीय व तृतीय स्थान प्राप्त केले. मराठी माध्यमातील वाणिज्य विभागाचा देखील उत्तम निकाल लागला आहे. तेजस्विनी सचिन खोब्रागडे ८९ टक्के पुनम दिलीप फंड ८६.५० टक्के व सायरा आजम शेख ७९.८३ टक्के गुण प्राप्त करून यांनी अनुक्रमे प्रथम,द्वितीय व तृतीय स्थान प्राप्त केले. इंग्रजी माध्यमातील वाणिज्य विभागाचा देखील उत्कृष्ट निकाल लागला आहे. करिष्मा संदीप सिंग ठाकूर ९१.१७ टक्के ,सिद्धी धनंजयसिंग ठाकूर ८९ टक्के व सिद्धी सचिनकुमार काळे ८३.६७ टक्के गुण प्राप्त करून यांनी अनुक्रमे प्रथम,द्वितीय व तृतीय स्थान प्राप्त केले. सर्व गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचे त्यांच्या पालकांसह पुष्पगुच्छ व मिठाई देवून अभिनंदन करण्यात आले. तत्पूर्वी प्रतिमेला माल्यार्पण, दीप प्रज्वलनाने व अतिथीच्या स्वागताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविक सुनील भोयर यांनी केले. प्राचार्य संजय सहारे यांनी उत्कृष्ट निकालाबाबत विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले तर मुख्य समन्वयक नूरसिंग जाधव, उपमुख्याध्यापक माया वंडलकर पर्यवेक्षक गणेश इंगळे, लालबहादूर यादव व अंशतः अनुदानित विभागाचे प्रमुख जितेंद्र वर्मा यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करीत समयोचित मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष रंजन बाबू केजडीवाल यांनी सर्वच गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचे ,त्यांच्या पालकांचे व विशेषतः सर्व शिक्षकांचे कौतुक करीत अभिनंदन केले. यापुढे देखील संस्थेचा नावलौकिक कायम राहील असा विश्वास व्यक्त केला. या अभिनंदन कार्यक्रमात सर्व वर्ग-शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन परीक्षा विभाग प्रमुख अजय कोयाळ यांनी केले तर आभार निलेश बोबडे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

राष्ट्रीय कलामंचाद्वारे कलाकार विद्यार्थ्यांना प्रोत्साहन

शहरातील कलाकार युवकांची झाली बैठक

वर्धा । प्रशांत अवचट

मंगळवारी वर्धा येथील हनुमान टेकडीवर शहरातील सर्व कलाकार विद्यार्थी आणि युवकांची कलाकार मीट अर्थात अनौपचारिक बैठक पार पडली. याप्रसंगी राष्ट्रीय कलामंचाच्या वर्धा शाखेतील कार्यकर्त्यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. दरम्यान गायन, साहित्य, सोशल मीडिया कन्टेन्ट क्रीटर्स आणि विविध कला क्षेत्राशी संबंधित युवकांनी आपली उपस्थिती दर्शवून महाविद्यालय आणि विद्यार्थ्यांमध्ये कलेच्या माध्यमातून सकारात्मक वातावरण रुजविण्याच्या दृष्टीने सर्वांनी विचार मांडले. याप्रसंगी राष्ट्रीय कलामंचाचे विदर्भ प्रांत संयोजक मनिष तिवारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

या बैठकीत चर्चा करताना राष्ट्रीय कलामंच वर्धा शाखेच्या नगर संयोजक पंखुडी अग्रवाल यांनी आपले मत मांडत असताना संगीत, साहित्य आणि मनोरंजनाच्या दृष्टीने वर्धा शहरातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याचे लक्ष्य असल्याचे सांगितले. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या रचनात्मक प्रतिभा विकसित व्हावी, सोशल मीडियाच्या रील्स,विडिओ अन्य कंटेन्टद्वारे जनसामान्यात सकारात्मक दृष्टिकोण रुजविण्यासाठी राष्ट्रीय कलामंच विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत असल्याचे सुद्धा पंखुडी अग्रवाल यांनी सांगितले. राष्ट्रीय कलामंचद्वारे नुकत्याच पार पडलेल्या नॅशनल स्टुडंट्स फिल्म फेस्टिवलमध्ये बेस्ट स्क्रीन प्ले अवार्ड विजेते युवा दिग्दर्शक वैभव दुधकोहळे हे सुद्धा उपस्थित होते, सिने दिग्दर्शक विवेक अग्निहोत्री यांच्या हस्ते त्यांना पारितोषिक मिळाले होते. राष्ट्रीय कलामंच विदर्भ प्रांत संयोजक मनिष तिवारी यांनी कलाकार मीटमध्ये वैभव दुधकोहळे यांचे स्वागत व अभिनंदन केले. याप्रसंगी राष्ट्रीय कलामंच वर्धा नगर संयोजक पंखुडी अग्रवाल, वेदांत बावनकर, उज्वल मसने, मंथन नलगे आदी उपस्थित होते.

> ❝ माझा प्रथम प्रयोग असलेल्या काल: या संस्कृत भाषेतील लघुपटाला उत्कृष्ट संकलन आणि छायांकन आणि सर्वोत्कृष्ट स्क्रीनप्ले म्हणून पारितोषिक देऊन राष्ट्रीय कलामंचाने मोठ्या व्यासपीठावर मला सन्मानित केले. राष्ट्रीय कलामंचाच्या नॅशनल स्टुडंट्स फिल्म फेस्टिवल आयोजन समितीचा आभारी आहे. प्रेक्षकांसाठी पुढील लघुपटाची तयारी सुद्धा लवकरच सुरु करणार असून याची शूटिंग वर्धा जिल्ह्यातच होईल.
>
> –वैभव दुधकोहळे,
> युवा दिग्दर्शक वर्धा.

श्री साई सायन्स अँड कॉमर्स ज्युनिअर कॉलेज भिशी चा निकाल शंभर टक्के

चिमूर । प्रतिनिधी

चिमूर तालुक्यातील भिसी येथील श्री साई सायन्स अँन्ड कॉमर्स ज्युनियर कॉलेज भिसी चा हा पहीलाच वर्ष. कॉलेज ने पहील्याच वर्षी वर्ग १२ चा १०० टक्के निकाल देऊन किमयाच केली. पहील्याच वर्षी प्रतिस्पर्ध्याकडून आलेल्या अडचनींवर मात करीत या कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी चांगला अभ्यास करीत १०० टक्के निकाल दिला. यामध्ये शिक्षकांचा महत्वाचा वाटा आहे. आणि त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

सायन्स फॅकल्टी मधून कु. नंदीनी संजय धकाते हिने चिमुर तालूक्यातून व्दितीय तसेच आंबेनेरी केंद्रातून प्रथम स्थान प्राप्त करीत ७६.१७ टक्के गुण प्राप्त केले. अमित सुरेन्द्र नन्नावरे याने ७४.६७ टक्के गुण प्राप्त करून आंबेनेरी केंद्रातून व कॉलेज मधुन व्दितीय स्थान प्राप्त केले.श्री स्वामी नारायण बहुउद्येशीय संस्था व्दारा संचालित भिसी येथील श्री साई सायन्स अँन्ड कॉमर्स कॉलेज चा उद्येश ग्रामीण भागातील हुशार विद्यार्थ्यांना उच्च दर्जाच शिक्षण देणे व त्यांचे भविष्य घडविणे असुन यासाठी संस्था चालक तसेच उच्चशिक्षीत शिक्षक वर्ग नेहमी प्रयासरत आहेत. वर्ग १२ मध्ये पास सर्व विद्यार्थ्यांचे नागरिकांकडून अभिनंदन केल्या जात आहे. या सर्व विद्यार्थ्यांचा संस्थेकडून पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले असून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

सहा महिने घरीच अभ्यास करून रियाने मिळवले ८७ टक्के गुण

चिमूर । प्रतिनिधी

चिमूर तालुक्यातील शंकरपूर येथील रहिवासी रिया प्रदीप गारघाटे हिने प्रकृतीच्या कारणास्तव सहा महिने कॉलेजला न जाता नुकत्याच झालेल्या बारावीच्या परीक्षेत कठीण परिस्थितीमध्ये जीकरीने अभ्यास करून सायन्स मध्ये ८७ टक्के गुण मिळवून एक आदर्श निर्माण केला आहे. त्यामुळे तिचे वर सर्वच स्तरावरून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

रिया ही मागील सत्रात नागपूर येथील संत पाल ज्युनियर कॉलेज मध्ये बारावी सायन्स मध्ये शिकत असताना तिची प्रकृती अचानक पणे बिघडली. त्यामुळे तिला नागपूर येथीलच दवाखान्यामध्ये भरती करण्यात आले. तिचे दिनांक ५ मे २०२३ ला किडनीचे मेजर सर्जरी करण्यात आली. त्यानंतर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार तिला सहा महिने कम्प्लीट बेड रेस्ट म्हणून घरीच ठेवण्यात आले. परंतु तिने अशाही कठीण परिस्थितीमध्ये हार न मानता वडिलांच्या मार्गदर्शनात घरीच अथक परिश्रम घेऊन बारावीचा अभ्यास सुरू केला. आणि सहा महिने घरीच अभ्यास करून बारावीची परीक्षा दिली. नुकत्याच लागलेल्या बारावीच्या निकालामध्ये अशाही अवघड परिस्थितीमध्ये तिला ८७ टक्के गुण मिळाल्याने तिचेवर प्राध्यापक वर्गाकडून तसेच गावातील नागरिकाकडून अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

तिने केलेल्या मेहनतीचे फळ तिला मिळाल्याने वडील प्रदीप गारघाटे यांनी तिच्या यशाबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

गोंडपिपरीतील विविध पक्षाच्या कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश

विधानसभा निवडणुक प्रमुख देवराव भोंगळे यांनी केले स्वागत

गोंडपिपरी । प्रतिनिधी

तालुक्यातील विविध पक्षाच्या अनेक कार्यकर्त्यांनी (दि. २१) भारतीय जनता पक्षात जाहीर पक्षप्रवेश केला.

भाजपा गोंडपिपरी कार्यालयात झालेल्या या पक्षप्रवेश कार्यक्रमात विधानसभा निवडणुक प्रमुख देवराव भोंगळे यांनी सर्व नवप्रवेशीतांच्या गळ्यात पक्षाचे दुपट्टे टाकून भाजप परीवारात स्वागत केले. यामध्ये शिवसेना (उ.बा.ठा) चे शहराध्यक्ष रियाज कुरेशी, करंजीचे सामाजिक कार्यकर्ते क्षितील लोणारे, सुमीत पिंगे, अब्दुल आहाद, अब्दुल समद, अल्तमस शेख, कार्तिक कन्नाके, अनिकेत मांडवगडे, ओंकेश लोणारे, अमित भोयर, साहिल बट्टे, उमेश भोयर, विशाल चंद्रगीरीवार, शुभम कलगटवार, नितेश कलगटवार, रीतीक चिलनकर, निखील चौधरी, लोमेश नागापूरे आणि जयंत कोहपरे यांचा समावेश आहे. याप्रसंगी देवराव भोंगळे यांनी या सर्वांच्या गळ्यात पक्षाचे दुपट्टे टाकून भाजप परीवारात मनःपुर्वक स्वागत केले. याप्रसंगी बोलताना, विश्वगौरव, पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या विकासाभिमुख नेतृत्वाने प्रभावित होत जिल्ह्याचे पालकमंत्री ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून या सर्व कार्यकर्त्यांनी भाजपात प्रवेश केला आहे. त्यांचे मी मनापासून स्वागत करतो. येत्या काळात गोंडपिपरी तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी या सर्व युवा मित्रांचे सहकार्य लाभणार आहे. राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या नेतृत्वात आम्ही सर्व या भागाचा चेहरामोहरा बदलविण्यासाठी प्रयत्नशील आहोत. असा विश्वास देवराव भोंगळे यांनी सर्वांना दिला. यावेळी माजी पं. स. सभापती दिपक सातपुते, माजी जि. प. सदस्य अमर बोडलावार, शहराध्यक्ष चेतन गौर, सुहास माडूरवार, राकेश पुन, स्वप्निल बोनगीरवार, वैभव बोनगीरवार,रमेश दिनगलवार, गणेश मेरूगवार, पंकज चिलनकर,गणेश डहाळे, मनोज वनकर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

नागापुरे दांपत्याने अनोख्या पद्धतीने साजरा केला लग्नाचा वाढदिवस

वरोरा । प्रतिनिधी

आनंद निकेतन महाविद्यालय वरोरा येथे कर्मचारी म्हणून कार्यरत असलेले प्रमोद नामदेवराव नागापुरे आणि त्यांच्या पत्नी विमा अभिकर्ता शारदा नागापुरे यांनी समाजसेवेचा वसा घेतला आहे.

समाजात जीवन जगत असताना समाजाला काही देणं लागत असे समजून ते गोरगरीब जनतेच्या, लग्नप्रसंगी, वाढदिवसा प्रसंगी, गोरगरीब कुटुंबांना,फुल नाही फुलाची पाकळी म्हणून यथाशक्ती मदत करीत असतात. असे व्यक्तिमत्व प्रमोद नामदेवराव नागापुरे व पत्नी शारदा नागापुरे यांनी आपला लग्न वाढदिवस आनंदवन येथील सावली मध्ये राहणाऱ्या वृद्ध पुरुष व महिला यांना टरबूज व खरबूज कापून वाटप करून लग्नाचा वाढदिवस साजरा केला . यावेळी महारोगी सेवा समिती आनंदवन चे विश्वस्त डॉक्टर विजय पोळ, आनंदवन ग्रामपंचायतचे उपसरपंच शौकत खान, आरोग्य सेविका कीर्ती लोहकरे, सरला चौधरी उपस्थित होते.

करीश्मा ठाकुर पुलगाव शहरातून वाणिज्य शाखेतून प्रथम

पुलगाव–येथील आर.के.विद्यालयची ची विद्यार्थिनी करीश्मा संदीप सिंह ठाकुर पुलगांव शहरातून १२वी मधे कॉमर्स शाखा मधून प्रथम आली हिने ९१.१७ टक्के गुण मिळवीत कॉमर्स शाखेमधून पुलगाव शहरात प्रथम आली .करीश्मा ने नियमित अभ्यास करून हे यश प्राप्त केले. तिने भविष्यात यूपीएससी करण्याची इच्छा व्यक्त केली तिचे वडील संदिपसिह ठाकुर श्रीराम मंदिर शोभायात्रा यात्रा समिती चे अध्यक्ष व व्यवसायी आहे. आई गृहिणी आहे .आपल्या यशाचे श्रेय आई वडीलासह परिवारातील सदस्य शाळेतील सर्व शिक्षकवर्ग दिले. जितेंद्र वर्मा यांनी तिला मार्गदर्शन केले. करीश्मा ला समोरच्या वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यासाठी करीश्मा घरी जावून शुभेच्छा दिल्या त्या वेळी धिरजसिह ठाकुर, राजन चौधरी, अविनाश, भोपे, रवि केशरवानी,शुभम चौरोसिया,जगदिशसिह चव्हाण, विनोद दुबे, व्यंकटेश करंडे, गट्टू वर्मा, मुन्ना पांडे, आदि समोरच्या वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

आनंद निकेतन महाविद्यालयाचे नेत्रदीपक यश

आनंदवन । प्रतिनिधी

नुकत्याच जाहीर झालेल्या बारावी बोर्डाच्या परीक्षेत आनंदनिकेतन महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नेत्र दीपक यश संपादन केले. महाविद्यालयाचा एकूण निकाल ९६.२२ टक्के असून विज्ञान शाखेचा निकाल ९८.७५ टक्के लागला .

कला शाखेचा निकाल ८६.१३ टक्के व वाणिज्य शाखेचा निकाल ९७.१९ टक्के लागला विज्ञान शाखेतून ओम कापसे हा विद्यार्थी ९४.८३ टक्के गुण घेऊन महाविद्यालयातून प्रथम आला. कला शाखेतून कुमारी सानिका खामकर ८५.३३ टक्के गुण घेऊन व वाणिज्य शाखेतून इंग्रजी माध्यमातून पियुष नीरसकर हा ९३ टक्के गुण घेऊन प्रथम आला.वाणिज्य मराठी माध्यमातून कु .रोहिणी कुंभारे ८५.१७ टक्के गुण मिळवून प्रथम आली.विज्ञान शाखेचे १८ विद्यार्थी विशेष प्राविण्य श्रेणी घेऊन उत्तीर्ण झालेत तर वाणिज्य शाखेचे १४ विद्यार्थी विशेष प्राविण्यसह उत्तीर्ण झाले.

एकंदर उत्तम निकालाची परंपरा यावर्षीही आनंदनिकेतन महाविद्यालयाने कायम ठेवली. सर्व विद्यार्थ्यांचे महारोगी सेवा समिती चे सचिव डॉ. विकास आमटे, आनंदवन परिवार,प्राचार्य डॉक्टर मृणाल काळे उपप्राचार्य राधा सवाने व सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .